दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक : सागरा राणा अंभोरे  संपादक : बंडूभाऊ इंगोले
RNI No - MHMUL/25/A0788
■ वाशीम ■ गुरुवार, २२ जानेवारी २०२६ ■ वर्ष : २ ■ अंक : २८६ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353

## कॉपी प्रकरणांवर राज्य मंडळाचा कारवाईचा बडगा; मुंबई महापालिका शाळेतील ३६६ विद्यार्थी पहिल्यांदाच देणार सीबीएससी दहावी परीक्षा!

**मुंबई, प्रतिनिधी :** दहावी आणि बारावी परीक्षांतील गैरप्रकार रोखण्यासाठी राज्यभर 'कॉपीमुक्त अभियान' राबवले जात असताना, दुसरीकडे मुंबईतील मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत सुरू असलेल्या सीबीएससी संलग्न शाळांमधील ३६६ विद्यार्थी यंदा पहिल्यांदाच दहावीच्या सीबीएससी बोर्ड परीक्षेला सामोरे जाणार आहेत. दहावीची परीक्षा १७ फेब्रुवारी ते ११ मार्च २०२६ या कालावधीत पार पडणार आहे.



**ऑनलाइन मार्गदर्शन सत्रे सुरू :** "महानगरपालिकेच्या १० शाळांमधील ही पहिली तुकडी असून, या विद्यार्थ्यांचा निकाल भक्कम लागावा यासाठी मुंबई महानगरपालिका प्रशासनानं कंबर कसली आहे. विद्यार्थ्यांकडून नियमितपणे सराव प्रश्नपत्रिका सोडवून घेतल्या जात आहेत. गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्र, इंग्रजी आणि माहिती तंत्रज्ञान या विषयांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. याशिवाय काही खासगी सीबीएससी शाळांमधील तज्ज्ञ शिक्षकांचेही मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळत आहे. उत्तरपत्रिका कशा लिहायच्या, वेळेचे योग्य नियोजन कसे करायचे, प्रश्न नीट समजून कसे सोडवायचे, यासाठी ऑनलाइन मार्गदर्शन सत्रे सुरू करण्यात आली आहेत," अशी माहिती पालिका अतिरिक्त आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अविनाश ढाकणे यांनी दिली.

**विशेष उपक्रमांमुळे निकालाची टक्केवारी वाढली :** "महानगरपालिकेच्या शाळांमध्ये मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी, गुजराती, तामिळ, तेलगू आणि कन्नड अशा आठ भाषांमध्ये शिक्षण दिलं जाते. इथं एसएससी, सीबीआय, आयसीएसई आणि आयबी अशा चार मंडळांचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. एसएससी विद्यार्थ्यांसाठी राबवण्यात आलेल्या विशेष उपक्रमांमुळे निकालाची टक्केवारी ९३ टक्क्यांपर्यंत पोहोचली असून, आता हाच फॉर्म्युला सीबीएससी विद्यार्थ्यांसाठी वापरण्यात येत आहे," असं डॉ. अविनाश ढाकणे यांनी सांगितलं.

**गुणवत्ता आणि पारदर्शकतेवर भर :** एकीकडे मुंबई महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थी पहिल्यांदाच सीबीएससी बोर्ड परीक्षेला सामोरे जात असताना, त्यांच्यासाठी विशेष तयारी, मार्गदर्शन आणि सराव सुरू आहे. तर दुसरीकडे, राज्य मंडळाकडून कॉपी प्रकरणांवर कठोर कारवाई करून परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक, शिस्तबद्ध आणि विश्वासार्ह करण्याचा प्रयत्न केला जात आहे. परीक्षा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्या असताना, विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये उत्सुकता वाढली असून, प्रशासनानेही कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी सर्व पातळ्यांवर तयारी अंतिम टप्प्यात आणली आहे.

**कॉपी प्रकरणांवर राज्य मंडळाचा कडक कारवाईचा बडगा :** दहावी आणि बारावी परीक्षांमध्ये कॉपीसारखे गैरप्रकार रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे राज्यभर 'कॉपीमुक्त अभियान' राबवलं जात आहे. याअंतर्गत परीक्षा केंद्रांवर अचानक तपासण्या, भरारी पथकांच्या भेटी, ड्रोनद्वारे निगराणी, पोलीस बंदोबस्त आणि केंद्रांबाहेर चित्रीकरण असे कडक उपाय करण्यात येत आहेत. तरीही काही ठिकाणी गैरप्रकार उघडकीस आल्यानं मंडळानं कठोर भूमिका घेतली आहे. राज्यभरातील दहावीची ३१ आणि बारावीची ७६ अशी एकूण १०७ परीक्षा केंद्रांची मान्यता रद्द करण्यात आली आहे. यामध्ये सर्वाधिक केंद्रे छत्रपती संभाजीनगर विभागातील आहेत. फेब्रुवारी–मार्च २०२५च्या दहावी परीक्षेत पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई आणि लातूर विभागांतील ३४ केंद्रांवर गैरप्रकार आढळून आले होते. त्यापैकी ३१ केंद्रांवर थेट कारवाई करण्यात आली आहे. राज्य मंडळानं पत्रकाद्वारे स्पष्ट इशारा दिला आहे की, यापुढं ज्या केंद्रांवर पुन्हा गैरप्रकार आढळतील, त्या केंद्रांची कायमची मान्यता रद्द केली जाईल.

## शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसमधील फूट भाजपच्या पथ्यावर; पुणे महापालिका निवडणुकीत भाजपला ४३ टक्के मते

**पुणे, प्रतिनिधी :** शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीचा थेट फायदा महापालिका निवडणुकीत भाजपला झाल्याचे आकडेवारीवरून दिसून येत आहेत. महापालिका निवडणुकीच्या एकूण मतदानात ४३.१० टक्के मतदान एकट्या भाजपला झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला २३.९९, काँग्रेसला ८.४८, शिवसेना ६.९९, तर शिवसेनेला (ठाकरे) ४.२० टक्के मतदान झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाला केवळ ३.८६ टक्के मतदान झाले आहे.महापालिकेकडून मतमोजणीनंतरची अंतिम आकडेवारी




निश्चित करण्यात आली आहे. त्यातून ही माहिती समोर आली आहे.शहरातील ४१ प्रभागांतील १६५ जागांसाठी गेल्या आठवड्यात मतदान झाले. त्यामध्ये अ, ब, क, ड अशा प्रत्येक जागेसाठी सुमारे ३५ लाख ५१ हजार मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला.महापालिकेसाठी ५२ टक्के मतदारांनी आपला हक्क बजावला असून, मतदारांना प्रत्येकी ४ मते द्यायची होती. एकूण ७४ लाख ६३ हजार ८२४ मतदान झाले. त्यात ३२ लाख १८ हजार ६६४ मतदान (४३.१ टक्के) भाजपला झाले आहे. त्यामुळे भाजपचे सुमारे ११९ नगरसेवक निवडून आले आहेत. त्या खालोखाल सर्वाधिक १७ लाख ८६ हजार १७२ मतदान राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार) झाले आहे. तिसऱ्या क्रमांकाची ६ लाख ३२ हजार ९२४ मते काँग्रेसला मिळाली आहेत. शिवसेनेला ५ लाख २२ हजार १३८ मते मिळाली असून, शिवसेना (ठाकरे) पक्षाला ३ लाख ११ हजार ६६९ मते मिळाली असून, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला २ लाख ८८ हजार २०० मते मिळाली आहेत. उर्वरित मतांमध्ये इतर प्रमुख राजकीय पक्ष, अपक्ष, तसेच नोटाला मिळालेल्या मतांचा समावेश आहे.या निवडणुकीत निवडणूक लढविणाऱ्या काही मोठ्या राजकीय पक्षांपेक्षाही 'नोटा'ला अधिक मतदान झाले आहे.

पुण्यात 'नोटा'ला एकूण २ लाख २१ हजार २०९ मतदान झाले आहे, तर सर्व अपक्ष उमेदवारांना १ लाख ४७ हजार २७८ मतदान झाले आहे. मनसेला झालेले मतदानही 'नोटा'पेक्षा कमी असून, ते १ लाख ५५ हजार ७८८ आहे.

## नशाही नशा हैं, २१ लाखांचा गुटखा जप्त

**नाशिक, प्रतिनिधी :** मालेगाव तालुक्यातील मुंबई आग्रा महामार्गावर सायने शिवारात पोलिसांनी प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखूची वाहतूक करणाऱ्या ट्रकवर कारवाई केली. यात सुमारे २१ लाख ६० हजार रुपये किमतीचा गुटखा, जर्दा आणि तंबाखूचा साठा तसेच पाच लाख रुपांचा ट्रक असा एकूण २६ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई सोमवारी (दि. १९) पहाटेच्या सुमारास करण्यात आली.पोलिसांनी संशयावरून ट्रक (एमपी १३, झेडडब्ल्यू



१७०५) अडवून तपासणी केली. त्यात राज्यात प्रतिबंधित असलेला गुटखा आणि सुगंधित तंबाखूचा मोठा साठा आवळून कंपन्यांचा ४० गोण्या गुटखा, ८ गोण्या पानमसाला तसेच मोठ्या प्रमाणावर सुगंधित तंबाखू जप्त करण्यात आली. याप्रकरणी ट्रकचालक शोकीनखों इदेखौं याच्याविरुद्ध अन्न व औषध प्रशासन कायदा तसेच भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, अवैध गुटखा वाहतुकीमागील मुख्य सूत्रधार कोण, हा साठा कुठून आला आणि कुठे वितरण होणार होता, याचा तपास सुरू आहे. राज्यात गुटखाबंदी असतानाही अशा प्रकारे सर्रास वाहतूक सुरू असल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे मालेगावात गेल्या वर्षभरात कोट्यवधी रुपयांचा गुटखा साठा जप्त केला असूनही अवैध व्यापार थांबत नसल्याने पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

## शहीदी समागम कार्यक्रमात पंचक्रोशीतील गावांच्या सहभागासाठी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांचा पुढाकार

**नांदेड, प्रतिनिधी :** शिख पंथाचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमानिमित्त नांदेड शहर व पंचक्रोशीतील गावकऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग मिळावा, यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी लंगर साहिब गुरुद्वारा येथे भेट देऊन बाबा बलविंदरसिंगजी यांच्याशी चर्चा केली.



यावेळी बाबा बलवंदरसिंग यांनी नांदेड शहरासह पंचक्रोशीतील सर्व नागरिकांना आवाहन केले की, शनिवार २४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ वाजता तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारा येथून निघणाऱ्या भव्य नगर किर्तनात नागरिकांनी, महिला, युवक व बालगोपालांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. तसेच प्रत्येक गावातून किमान एक दिंडी भजन मंडळासह नगर किर्तनात सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी केले.

श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी धर्म, मानवी हक्क व समाजहितासाठी दिलेल्या बलिदानाचा गौरवशाली इतिहास समाजापर्यंत पोहोचावा, यासाठी जनसहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले. नगर किर्तनाच्या माध्यमातून त्याग, बलिदान व सामाजिक ऐक्याचा संदेश संपूर्ण देशभर पोहोचेल आणि श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांना हीच खरी अभिवादन ठरेल, असे बाबा बलविंदरसिंग यांनी सांगितले.

## रत्नागिरीसह लांजा, राजापूर बसेसची दुरवस्था

### खुर्च्या तुटलेल्या, सीट खराब, कुशन निघालेले, शहर, ग्रामीण एसटी बसेसची अवस्था बिकटच

**रत्नागिरी, प्रतिनिधी :** रत्नागिरी विभागात नवीन स्मार्ट बसेस आल्या मात्र त्या लांब पल्ल्याच्या मार्गावर धावत आहेत. तर उर्वरित काही बसेस जिल्हांतर्गत बसेस धावतात. मात्र लांजा, राजापूर, चिपळूण, रत्नागिरीसह इतर आगारातील बसेसची दुरवस्था झालेली आहे. खुर्च्या तुटलेल्या, सीट खराब, कुशन निघालेले अशी अवस्था झालेली आहे. लांजा-काजरघाटी मार्गे रत्नागिरी या बसेसची अवस्था तर बिकटच झाली आहे. त्यामुळे प्रवासी वैतागलेले आहेत. त्यांना खुर्च्यावर बसताना अडचण होत असून नाईलाजास्तव उभे राहून प्रवास करावा लागत आहे.



रत्नागिरी विभागातील जुन्या, स्क्रॅप झालेल्या तब्बल १४५ बसेस भंगारात देण्यात आले. त्या लिलावातून तब्बल साडेतीन कोटींचे उत्पन्न मिळाले. मात्र आणखी कित्येक बसेस खराब झालेल्या असून त्या तशाच रस्त्यावर धावत आहेत. रत्नागिरी, राजापूर, लांजा, गुहागर, चिपळूण, देवरुखसह शहरातील बसेसच्या ही दुरवस्था झालेली आहे. आतील सीट खराब झालेल्या आहेत. बसेसमध्ये अस्वच्छता झालेली आहे. धुळीने गाडी घाण होत आहे.प्लॅस्टीक पिशव्या, पाण्याच्या बाटल्या पडलेल्या आहेत. मात्र याकडे अक्षम्य दुर्लक्ष होताना दिसत आहे. प्रवासी एसटी बसेसमध्ये प्रवेश केल्यानंतर काही सीट खराब असल्यामुळे उभे राहून प्रवास करावा लागत आहे. खुर्च्या तुटलेल्या, कुशन निघालेले, सीट खाली पडलेले आहे. कित्येक प्रवाशांना किरकोळ इजा झालेली आहे. तसेच अशा सीटवर बसल्यामुळे पाठ दुखण्याचा त्रास वाढला आहे. शहरातील बसेसची अवस्था त्याहून वाईट झालेली आहे. त्यामुळे नव्या बसेसची मागणी प्रवाशांकडून होत आहे. नाहीतर आहे त्या बसेसची दुरुस्ती व्हावी अशी मागणी नोकरदार, व्यापारी, सर्वसामान्य, विद्यार्थी प्रवाशांमधून होत आहे.

**नव्या बसेस,ई-बसेस येणार कधी?**

१४५ हून अधिक बसेस भंगारात गेल्यामुळे रत्नागिरी विभागात बसेसची संख्या कमी झाली आहे. तसेच अद्याप कित्येक बसेस खराब आहेत. आहे त्याच परिस्थितीत रस्त्यावर धावत आहे.

त्यामुळे नव्या स्मार्ट बसेस, ई-बसेस आल्यास शहराबरोबर ग्रामीण वाहतूक सुरळीत होईल. अद्याप चार्जिंग स्टेशनचे काम अपूर्ण असल्यामुळे खेड, रत्नागिरी, चिपळूणचे काम कासवगतीनेच सुरू आहे.

## राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरणाचे केंद्रीय जलशक्ती मंत्र्यांसमोर सादरीकरण

### पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी मांडली राज्य शासनाची भूमिका

**नवी दिल्ली, प्रतिनिधी :**

महाराष्ट्रातील नद्यांना प्रदूषणाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी राज्य सरकारने ऐतिहासिक पुढाकार घेत 'राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण' स्थापन करण्याची महत्त्वपूर्ण संकल्पना मांडली होती. राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन यासंदर्भातील प्रस्तावाचे सादरीकरण केले. या प्राधिकरणास मंजुरी मिळाल्यास ते देशातील



पहिले प्राधिकरण ठरणार असल्याचे मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

या विशेष बैठकीत मंत्री मुंडे यांनी राज्यातील जल आणि पर्यावरण प्रकल्पांच्या सद्यस्थितीवर सविस्तर चर्चा केली. नद्यांच्या स्वच्छतेसाठी केंद्र सरकारच्या मदतीसोबतच राज्याची स्वतःची एक स्वतंत्र यंत्रणा आणि नियोजन असणे काळाची गरज असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले. देशातील अनेक नद्या विविध राज्यांतून प्रवाहित होतात. जर प्रत्येक राज्याने आपल्या भौगोलिक सीमेतील नदीपात्राच्या स्वच्छतेसाठी आणि पुनरुज्जीवनासाठी स्थानिक पातळीवर प्रभावी व सुनियोजित योजनांची अंमलबजावणी केली, तर नद्यांचे पूर्णतः प्रदूषणमुक्त करण्याचे स्वप्न सत्यात उतरू शकेल असे मंत्री मुंडे यांनी यावेळी सांगितले. या प्रक्रियेमुळे भविष्यात नद्यांचे पावित्र्य आणि त्यांची नैसर्गिक प्राकृतिकता टिकवून ठेवण्यात देशाला मोठे यश मिळेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## राजोडी समुद्रकिनाऱ्यावर रंगला राष्ट्रीय स्टँडअप पॅडल चॅम्पियनशिपचा थरार

**वसई, प्रतिनिधी :** विरारमधील राजोडी समुद्रकिनाऱ्यावर नुकतीच राष्ट्रीय स्टँडअप पॅडल चॅम्पियनशिप स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत देशभरातील तब्बल १०० स्पर्धक सहभागी झाले होते.



विरार पश्चिमेला राजोडी समुद्र किनारा आहे. नुकतीच या समुद्रकिनारी असणाऱ्या मुंबई सर्फ क्लबमध्ये राष्ट्रीय स्टँडअप पॅडल चॅम्पियनशिप स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. मुंबई सर्फ फेस्टिवल अंतर्गत आयोजित या स्पर्धेत विविध राज्यातील १०० हून अधिक तज्ञ आणि अनुभवी खेळाडू सहभागी झाले होते.या कार्यक्रमाला पालघर जिल्ह्याचे उपजिल्हाधिकारी विशाल खत्री, माजी महापौर राजीव पाटील, महाराष्ट्र खो-खो फेडरेशनच्या अध्यक्षा ग्रीष्मा पाटील आणि महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे कॅप्टन लेपांडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुंबई सर्फ क्लबच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रीती रावत यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत केले. तर उपजिल्हाधिकारी खत्री आणि राजीव पाटील यांनी हिरवा कंदील दाखवून पहिल्या शर्यतीचा प्रारंभ केला. उपजिल्हाधिकारी विशाल खत्री यांनी मुंबई सर्फ क्लबचे अभिनंदन करत, "अशा विविध प्रकारच्या जलक्रीडा महाराष्ट्रात प्राधान्याने राबवून सागरी पर्यटनास चालना देणे गरजेचे आहे. शासनाकडून वेळोवेळी सहकार्य केले जाईल", असे आश्वासन त्यांनी दिले. तसेच "अशा उपक्रमांमुळे सागरी पर्यटनाची विशेष ओळख निर्माण होऊन पर्यटकांचा ओघ वाढेल" असे प्रतिपादन माजी महापौर राजीव पाटील केले. तर, "आम्ही यजमानपदाचा मान योग्य क्लबला दिला," अशा शब्दांत कॅप्टन लेपांडे यांनी समाधान व्यक्त केले.सदर राष्ट्रीय चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये झालेल्या अटीतटीच्या सामन्यात शेखर पिचाई यांनी सुवर्ण पदक जिंकले. तसेच १४ वर्षीय आरतीने विविध स्पर्धांमध्ये ३ सुवर्ण पदके प्राप्त करत इतिहास रचला. तर महाराष्ट्रातील मनोज कुंभार, सिद्धि वनमाळी आणि अलिना जोशी यांनी अनुक्रमे सुवर्ण, रजत व कास्य पदक पटकावले.

## संपादकीय

### ट्रम्प ट्रॅश!

जी गोष्ट विकावयास नाही ती विकत घेण्याच्या प्रयत्नास बळकावणे असे म्हणतात. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे उत्तर गोलार्धाजवळील ग्रीनलँडबाबत हे करू इच्छितात. अमेरिकेची मानसिकताच व्यापारी. आपण पैशाने काहीही विकत घेऊ शकतो असे मानणारा एक मानवी समूह आपल्या आसपास नेहमी दिसतो. त्या वृत्तीचे आंतरराष्ट्रीय प्रतीक म्हणजे अमेरिका. त्या देशाचा भाग असलेले अलास्का, लुईझियाना आदी प्रांत अमेरिकेने विकत घेतलेले आहेत. म्हणजे असे प्रांत विकत घेणे हा अमेरिकेचा स्थायिभाव राहिलेला आहे. त्याचाच पुढचा भाग म्हणजे ग्रीनलँड विकत घेण्याचा या देशाचा प्रयत्न. याआधी अगदी १८६७ या वर्षी पहिल्यांदा वा नंतर पुढे १९१० या वर्षी अमेरिकेने असाच प्रयत्न करून पाहिला. तो अयशस्वी ठरला. नंतर दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेच्या ग्रीनलँड भुकेने पुन्हा उचल खाल्ली. त्या महायुद्धात ग्रीनलँडचे व्यवस्थापन ज्याकडे आहे तो डेन्मार्क देश हिटलरच्या नाझींकडून गिळंकृत होईल की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. हिटलरशी दोन हात करण्यात युरोपातील अन्य देशांच्या तुलनेत डेन्मार्क तितका भरभक्कम नव्हता. त्यामुळे त्या देशाने अमेरिकेकडे मदतीची याचना केली आणि त्यानंतर ग्रीनलँडमध्ये लष्करी तळ उभारून अमेरिकेने उभयतांचे रक्षण केले. तेव्हापासून या बर्फाळलेल्या भूमीवर अमेरिकी फौजा कायमच वास्तव्यास असतात. ट्रम्प यांची ग्रीनलँड भूक जागी होण्यामागे हे एक कारण. वास्तविक भौगोलिकदृष्ट्या ग्रीनलँड हा अमेरिकेच्या जवळ आहे असे अजिबात नाही. अमेरिका आणि ग्रीनलँडची अतिरम्य राजधानी नूक (Nuuk) यांच्यातील अंतर किमान ४८०० किमी इतके आहे. तरीही हे बेट आपल्या मालकीचे हवे असा ट्रम्प यांचा आग्रह. 'प्रेमाने' विकत दिले जाणार नसेल तर आपण ते डेन्मार्ककडून लष्करी बळावर हिसकावून घेऊ असे ट्रम्प म्हणतात. काही व्यक्तींचे वेडसर भासणारे इरादे प्रत्यक्षात आणण्याच्या वल्गनांवर कधीही संशय घेऊ नये. कारण शहाण्यांस वेडे वाटणारे निर्णय अशी माणसे प्रत्यक्षात आणू शकतात. ट्रम्प हे अशांतील एक. एरवी त्यांच्या या अशा प्रयत्नांकडे दुर्लक्ष करणे शहाणपणाचे. पण हा त्यांचा वेडसर भासणारा निर्णय अमलात येण्याचा धोका असल्याने त्यावर भाष्य आवश्यक ठरते.

याचे कारण म्हणजे हे आपले ग्रीनलँड बळकावचे ईप्सित साध्य करण्यासाठी ट्रम्प यांनी एक पाऊल पुढे टाकले असून या ग्रीनलँडला पाठिंबा देणाऱ्या देशांवर आर्थिक निर्बंध लादण्याचा निर्णय जाहीर केला आहे. सुरुवात म्हणून या देशांवर १० टक्के इतके आयात शुल्क आकारले जाईल. ग्रीनलँड भौगोलिकदृष्ट्या युरोप खंडाचा भाग. त्या खंडातील ब्रिटन, फ्रान्स आदी देशांनी ग्रीनलँड आणि म्हणून डेन्मार्कच्या बाजूने भूमिका घेतली. युरोपातील अनेक देशांना ट्रम्प यांची ही हडेलहप्पी पसंत नाही. एरवी अमेरिकाधार्जिणे असणारे अनेक देश ग्रीनलँडच्या मुद्द्यावर ट्रम्प यांची साथ सोडताना दिसतात. हे अर्थातच ट्रम्प यांना मान्य असणे शक्य नाही. ट्रम्प यांच्यासारखे नेते आपल्यातील जमीनदारी वृत्ती संधी मिळेल तेथे प्रकट करतात. ग्रीनलँड वादाने त्यांना ही आणखी संधी दिली. अशा मानसिकतेतील व्यक्तीस समोरच्याचे नुसते अनुमोदन चालत नाही. त्यांस संपूर्ण शरणागती हवी असते. युरोपीय देश त्यास तयार नाहीत. आधीच युक्रेनच्या मुद्द्यावर युरोपात दुभंग आहे. युक्रेनचा घास घेऊ पाहणाऱ्या रशियाच्या व्लादिमिर पुतिन यांना अनेक युरोपियनांचा विरोध. पण तो व्यक्त करण्यापलीकडे अधिक काही हे देश करू शकलेले नाहीत. कुठे शस्त्रपुरवठा कर, कुठे आर्थिक रसद पोहोचव इत्यादी कुटिरोद्योग हे युरोपीय देश युक्रेनच्या मुद्द्यावर चालवतात. पण ते तितकेच. त्याचा पुतिन यांच्यावर फारसा काही परिणाम होताना दिसत नाही. पुतिन यांच्यासाठी युरोपीय देशांपेक्षा अमेरिका काय भूमिका घेते आणि ट्रम्प कोणती पावले उचलतात, हे अधिक महत्त्वाचे. त्या आघाडीवर आपण ट्रम्प यांस खुंटीवर टांगू शकतो हे पुतिन यांनी वेळोवेळी दाखवून दिले आहे. त्यामुळे पुतिन ना अमेरिकेची फिकीर करतात ना युरोपची.

# कै.पार्वतीबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात "आनंद मेळावा" उत्साहात साजरा,

महाराष्ट्र जीत

**सुभाष खडसे** :माहूर तालुक्यातील वाई बाजार येथील कै.पार्वतीबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दि,21जानेवारी रोजी "आनंद मेळावा" हा उपक्रम अत्यंत उत्साहात व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान, खरेदी–विक्रीची प्रक्रिया, नफा–तोट्याची संकल्पना, शिस्तीचे महत्त्व तसेच पौष्टिक आहार व आरोग्य याबाबत प्रत्यक्ष अनुभवातून मार्गदर्शन मिळावे, हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश होता. यासोबतच विद्यार्थ्यांना ज्येष्ठांचे मार्गदर्शन लाभावे, हा देखील या कार्यक्रमामागील महत्त्वाचा हेतू होता.





या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाई बाजार ग्रामपंचायतीचे सरपंच सिताराम मडावी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उपाध्यक्षा व संस्थेच्या कोषाध्यक्षा सौ. अनुसयाबाई अंबादासजी राजुरकर,मा,जि,प उपाध्यक्ष समाधानभाऊ जाधव,उपसरपंच हाजी उस्मान खान पठाण,तं,मु,स,अध्यक्ष कैलास बेहरे,व्या संघटनेचे अध्यक्ष तथा शिवसेना नांदेड जिल्हा उपप्रमुख अनिल रुनवाल, सिंदखेड पोलीस स्टेशनचे सपोनि, रमेशराव जाधवर तसेच पत्रकार सुभाषbखडसे, उदय नाईक, गजानन वैद्य, ख्वाजा भाई, मतीन तगाले व मयुरेश राजुरकरआदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला.

या आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल, इत्यादींची मांडणी करून व्यवहार कौशल्यांचे प्रत्यक्ष धडे घेतले. विद्यार्थ्यांचा उत्साह, शिस्तबद्ध सहभाग आणि आत्मविश्वास सर्वांच्या कौतुकाचा विषय ठरला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे प्राचार्य मा.जी.यू. वट्टमवार यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकवृंद जी.बी.राठोड,एस. जी.मगरे,एन. एस.चव्हाण, श्रीमती के.ए.देवकर, तन्वी ढगे, अंकुश राठोड, किरण राठोड, बी. डी.सलाम,अक्षय नाळे,एस.व्ही. कन्नलवार,डी. एस.गोकणवार, एम.के.नागपुरे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कु.माही येलकंटवार व कु.सृष्टी पाटील यांनी अत्यंत प्रभावीपणे केले.

हा आनंद मेळावा विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाबरोबरच आनंद,अनुभव वआत्मविश्वास देणारा ठरला, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

## कै. पहिलवान भगवानराव जुंद्रे स्मरणार्थ लोहशिंगवे येथे महाराष्ट्र केसरी २०२६ नाशिक जिल्हा निवड चाचणी

महाराष्ट्र जीत

**नाशिक | प्रतिनिधी, गोकुळ लोखंडे** : महाराष्ट्र केसरी २०२६ स्पर्धेच्या नाशिक जिल्हा/शहर निवड चाचणी संदर्भात दिनांक १८ जानेवारी २०२५ (रविवार) रोजी दुपारी १२ वाजता बलकवडे पतसंस्था, भगूर येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीचे अध्यक्षस्थान नाशिक जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष ॲड. विशाल बलकवडे यांनी भूषविले. बैठकीस सर्व पदाधिकारी, वस्ताद, खेळाडू व कुस्तीप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीत कै. पहिलवान भगवानराव जुंद्रे यांच्या पवित्र स्मरणार्थ महाराष्ट्र केसरी २०२६ ची नाशिक जिल्हा निवड चाचणी कुस्ती स्पर्धा त्यांच्या मूळ गावी लोहशिंगवे, ता. व जि. नाशिक येथे आयोजित करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

ही स्पर्धा रविवार, दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार असून सकाळी ११ वाजता वजन तपासणी आणि दुपारी ३ वाजता कुस्ती क्षेत्रातील नामवंत पैलवानांच्या हस्ते स्पर्धांचे उद्घाटन होणार आहे. सदर स्पर्धा क्रीडा महर्षी पहिलवान भगवानराव जुंद्रे क्रीडांगण, लोहशिंगवे येथे होणार आहे.

या स्पर्धेचे आयोजन जुंद्रे पहिलवान शिक्षण संस्था व केसरी स्पोर्ट्स क्लब, लोहशिंगवे यांच्या माध्यमातून करण्यात येणार असून डॉ. दिपक जुंद्रे, सरपंच युवराज जुंद्रे



आणि पैलवान ग्रुपचे अध्यक्ष प्रवीण पाळदे हे प्रमुख आयोजक असणार आहेत. या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा यशस्वीपणे पार पडणार आहे.

या स्पर्धेचे विशेष आकर्षण म्हणजे २०२० चा महाराष्ट्र केसरी हर्षवर्धन सदगीर, ऑल इंडिया चॅम्पियन बाळू बोडके, तसेच पवन ढोणर, विजय सुरडे यांच्यासह अनेक नामवंत मल्ल या स्पर्धेत आपली ताकद आजमावणार आहेत. त्यामुळे कुस्तीप्रेमींना थरारक आणि दर्जेदार कुस्ती पाहण्याची संधी मिळणार आहे.

या बैठकीस प्रवीण पाळदे, अविनाश सहाणे, भगवान जुंद्रे, संजय गायकवाड, विकास मोरे, मनोज चकोर आदी मान्यवर उपस्थित होते. कै. भगवानराव जुंद्रे यांनी कुस्ती क्षेत्रासाठी दिलेल्या योगदानास मानवंदना देणारी ही स्पर्धा नाशिक जिल्ह्यातील कुस्ती परंपरेला अधिक बळ देणारी ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## शिवछत्रपती महाविद्यालय पाचोड येथे 'माईंड स्पार्क' एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न

महाराष्ट्र जीत

**प्रदीप पोटफोडे/पाचोड-** शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पाचोड येथील मानसशास्त्र विभाग, आकाशवाणी केंद्र संभाजीनगर आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने "माईंड स्पार्क (Mind Spark)" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या मानसिक क्षमतेचा विकास, सकारात्मक विचारसरणी, आत्मविश्वास वृद्धिंगत करणे व जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची मानसिक तयारी या उद्देशाने ही कार्यशाळा घेण्यात आली.या कार्यशाळेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून कन्नड येथील संत रामदास महाविद्यालयातील मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. महेंद्र पाटील यांची उपस्थिती होती तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून आकाशवाणी केंद्र संभाजीनगर येथील धम्मपाल जाधव हे उपस्थित होते अध्यक्षीय स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी भूषविले डॉ. महेंद्र पाटील त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांच्या मानसिक शक्तीचा योग्य वापर, प्रेरणा, आत्मजाणीव आणि ताणतणाव व्यवस्थापन



यावर सखोल विवेचन केले. "मन जागृत झाले की व्यक्तिमत्त्व घडते" असे प्रतिपादन त्यांनी केले.तसेच आकाशवाणी संभाजीनगर येथील धम्मपाल जाधव सर यांनी संवाद कौशल्य, सकारात्मक विचार, माध्यमांची भूमिका व व्यक्तिमत्त्व विकास यावर मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी उदाहरणांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व नवचैतन्य निर्माण झाले. डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो, असे सांगून मानसशास्त्र विभागाच्या कार्याचे कौतुक केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विलास महाजन यांनी केले. कार्यशाळेच्या उद्दिष्टांची माहिती देत 'माईंड स्पार्क' ही संकल्पना विद्यार्थ्यांच्या मानसिक क्षमतांना उजाळा देणारी असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संदीप सातोणकर यांनी केले. आभार प्रा.विनोद कांबळे यांनी मानले कार्यक्रमात प्रश्नोत्तर सत्र घेण्यात आले विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. याप्रसंगी विजेत्यांना ट्रॉफी देऊन त्यांना गौरवण्यात आले या एकदिवसीय कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना स्वतःच्या मनाची ओळख, आत्मप्रेरणा, सकारात्मक दृष्टिकोन व जीवन कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळाली. कार्यक्रमास महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ.शिवाजी यादव डॉ. गांधी बानायत डॉ. सुभाष पोटभरे डॉ.सुरेश नलावडे डॉ. भगवान जायभाय प्रा. सचिन कदम कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## ज्ञान, तंत्रज्ञान, विदेशी गुंतवणूक मिळविण्यासाठी दावोस दौरा – मुख्यमंत्री

**तिसऱ्या मुंबईतील रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा, एक लाख कोटींची गुंतवणूक येणार**

महाराष्ट्र जीत

**दाओस, प्रतिनिधी :**

स्वित्झर्लंडमध्ये वर्ल्ड ईकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीच्या निमित्ताने करण्यात येणारा दावोस दौरा हा भारतात आणि पर्यायाने महाराष्ट्रात ज्ञान, तंत्रज्ञान आणि विदेशी गुंतवणूक मिळविण्यासाठीचा महत्वाचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे सांगितले. दुसऱ्या दिवशी तिसऱ्या मुंबईतील पहिले शहर म्हणून रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा करण्यात आली.

आज प्रामुख्याने धोरणात्मक असे सामंजस्य करार करण्यात आले. ज्यामध्ये युनिव्हर्सिटी ऑफ कॅलीफोर्निया, युनिव्हर्सिटी ऑफ बर्कले, टेक्निकल युनिव्हर्सिटी ऑफ म्युनिक, अर्बन फ्युचर्स कलेक्टिव्ह -लंडन, आयसीसीआय-इटली, अँलाँग ट्युनिंग इन्स्टिट्यूट, नॉर्वेजीयन जीओ टेक्निकल इन्स्टिट्यूट, अर्बन प्लॅनिंगमधील सुबाना



जुरॉंग – सिंगापूर यांच्यासोबत टेक्निकल सामंजस्य करार केले आहेत. यातून एक प्रकारे केवळ गुंतवणूक नाही, तर ज्ञान आणि तंत्रज्ञानातून मोठ्या प्रमाणात उद्योग आणता येतील, वेगवेगळ्या क्षेत्रात चांगल्यारितीने काम करता येईल. अर्बन प्लॅनिंग, ट्रान्सपोर्टशी संबंधित करारांमुळे प्रत्येक शहरातील वाहतूक सुविधांची सरंचना चांगल्या रितीने करता येणार आहे.दावोस दौऱ्यातून नॉलेज-ज्ञान, टेक्नॉलॉजी-तंत्रज्ञान आणि एफडीआय-विदेशी गुंतवणूक मिळविता येते.

त्याचा देशाला आणि पर्यायाने राज्याला मोठा फायदा होतो. यंदा नागरी क्षेत्रातील नियोजन आणि परिवहन व्यवस्थेच्या दृष्टीने या क्षेत्रातील दिग्गज कंपन्याशी संवाद, समन्वय साधता आल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

# माहूर शहरातील घरकुल थकीत हप्त्यांबाबत नगराध्यक्ष व नगरसेवकांची मंत्रालयात दस्तक !

### प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत १४० नवीन घरकुलांना मंजुरी !

**पहिल्या टप्प्यातील निधीही मंजूर!**

महाराष्ट्र जीत

**सुभाष खडसे :** माहूर शहरातील प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत घरकुल लाभार्थ्यांच्या थकीत हप्त्यांमुळे वातावरण चांगलेच तापले असून, या मुद्द्यावरून शहरात राजकीय हालचालींना वेग आला आहे. आजी-माजी नगरसेवक, लोकप्रतिनिधी येणाऱ्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून लोकशाही मार्गाने निवेदने, उपोषणे व आंदोलने करत असल्याचे चित्र दिसून येत आहे.याच पार्श्वभूमीवर आज दिनांक २१ जानेवारी रोजी नगराध्यक्ष फिरोज दोसानी, उपनगराध्यक्ष नाना लाड, सभापती विजय कामटकर, नगरसेवक प्रतिनिधी रफिक सौदागर, सय्यद इरफान, अफसर अली, सुमित



खडसे, निसार कुरेशी, अमित येवतीकर यांनी मंत्रालय, मुंबई येथे म्हाडाचे अवर सचिव रवींद्र खेतले यांची भेट घेऊन माहूर शहरातील थकीत घरकुल हप्त्यांबाबत सविस्तर चर्चा केली. येत्या १५ दिवसांत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) १.० अंतर्गत ४८२ लाभार्थ्यांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासन संबंधित अधिकाऱ्यांनी दिले.यासंदर्भात प्रधानमंत्री आवास योजना १.० (वांद्रे पश्चिम) व २.० मंत्रालय कार्यालयात नगराध्यक्ष व नगरसेवकांनी निवेदन सादर केले.

दरम्यान, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत माहूर शहरातील १४० नवीन घरकुलांना दिनांक १३ जानेवारी २०२५ रोजी मंजुरी देण्यात आली आहे. या नवीन लाभार्थ्यांना वैयक्तिक स्वरूपातील घरकुल बांधकामासाठी केंद्र व राज्य शासनाचा समहिश्श्याचा निधी मंजूर झाला असून, लवकरच हा निधी लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होणार आहे.तसेच घरकुलासाठी स्वतःची जागा नसलेल्या लाभार्थ्यांना एआरएच व एएचपी योजनेअंतर्गत जागा उपलब्ध करून घरकुल खरेदीसाठी अर्थसहाय्य देता येईल, असा प्रस्ताव माहूर नगरपंचायतीने सादर करावा, असेही अवर सचिवांनी सूचित केले. यामुळे शहरातील गरीब, भूमिहीन व घर नसलेल्या कुटुंबांना थेट लाभ होणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

या पूर्वी ९३२ व आता १४० नवीन लाभार्थी

माहूर शहरात आतापर्यंत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ९३२ लाभार्थ्यांना घरकुलांचा लाभ मिळाला आहे. यापैकी ४५० लाभार्थ्यांचा प्रत्येकी २० हजार रुपयांचा शेवटचा हप्ता अद्याप प्रलंबित आहे. तर ४८२ लाभार्थ्यांचे घरकुलाचे काम प्रगतीपथावर असून भौतिक प्रगतीनुसार निधी वितरित करण्यात आला आहे.याच योजनेअंतर्गत १८ नोव्हेंबर रोजी ४ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला होता. आतापर्यंत एकूण १५ कोटी रुपयांचा निधी टप्प्याटप्प्याने वितरित झाला असून उर्वरित निधीसाठी मात्र लाभार्थ्यांची सहनशक्ती संपत चालली आहे. नगरपंचायत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत असून या प्रश्नाला आता स्पष्टपणे राजकीय वळण मिळाले आहे.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र–४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा,

## महागांवमध्ये पोलीस भरती अकॅडमीची नितांत गरज; आमदारांनी तातडीने पुढाकार घ्यावा

**लखन लोंढे/महागांव :** महागांव तालुका हा युवकांची मोठी संख्या असलेला ग्रामीण भाग असून, दरवर्षी शेकडो युवक-युवती पोलीस, सैन्य, एसआरपीएफ, होमगार्ड तसेच इतर सुरक्षा दलांच्या भरती परीक्षांसाठी तयारी करीत आहेत. मात्र तालुक्यात स्वतंत्र पोलीस भरती प्रशिक्षण अकॅडमी नसल्यामुळे इच्छुक तरुणांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

सध्या पोलीस भरतीसाठी लागणारे शारीरिक प्रशिक्षण, लेखी परीक्षा मार्गदर्शन, मैदानी सराव व तज्ज्ञ मार्गदर्शनासाठी विद्यार्थ्यांना पुसद, यवतमाळ, अमरावती, नांदेड किंवा नागपूर यांसारख्या शहरांकडे धाव घ्यावी लागत आहे. यामुळे दरमहा हजारो रुपयांचा अतिरिक्त खर्च येत असून, आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील अनेक युवकांना प्रशिक्षण अर्धवट सोडावे लागते किंवा भरती प्रक्रियेतून बाहेर पडावे लागते.

महागांव तालुक्यात मोठ्या प्रमाणावर शासकीय मोकळी जमीन उपलब्ध असून, नैसर्गिकदृष्ट्या धावपट्टी, मैदानी प्रशिक्षणासाठी पोषक वातावरण आहे.

तरीदेखील आजपर्यंत येथे पोलीस भरती अकॅडमी उभारण्यासाठी कोणतीही ठोस पावले उचलण्यात आलेली नाहीत, ही बाब युवक व पालक वर्गात तीव्र नाराजी निर्माण करणारी आहे.

जर महागांव मध्ये स्वतंत्र पोलीस भरती अकॅडमी उभारण्यात आली, तर

१) स्थानिक युवकांना गावातच दर्जेदार प्रशिक्षण मिळेल,

२) बेरोजगारीचे प्रमाण कमी होईल,

३) ग्रामीण भागातील गुणवत्तावान तरुण देशसेवेसाठी घडतील,

४) तालुक्याच्या सामाजिक व शैक्षणिक विकासाला चालना मिळेल.

या पार्श्वभूमीवर उमरखेड-महागांव विधानसभा मतदारसंघाचे आमदारांनी या विषयाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, शासनाकडे तातडीने प्रस्ताव सादर करून निधी मंजूर करून घ्यावा, अशी जोरदार मागणी युवक-युवती, पालकवर्ग व सुजाण नागरिकांकडून होत आहे.

निवडणुकीच्या काळात रोजगार व युवक विकासाबाबत मोठमोठी आश्वासने दिली जातात; मात्र प्रत्यक्षात अशी मूलभूत गरज अद्यापही दुर्लक्षित असल्याचा आरोप नागरिकांतून केला जात आहे.

त्यामुळे आता केवळ आश्वासनांवर समाधान न मानता, ठोस निर्णय व प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची अपेक्षा महागांवकर व्यक्त करीत आहेत.

## पुरंदरच्या विकासासाठी आणि वंचितांच्या न्यायासाठी प्राचार्य पंढरीनाथ आढाळगे रिंगणात

**प्रतिनिधी शाम जगताप** :पुरोगामी संघर्ष परिषदेच्या माध्यमातून 'दिवे' मतदार संघातून उमेदवारी अर्ज दाखल; प्रस्थापितांना आव्हान




सासवड: (प्रतिनिधी) "राजकीय पक्ष सर्वसामान्य जनतेला न्याय देण्यात अपयशी ठरले आहेत. केवळ सत्तेचे राजकारण न करता, शासकीय योजना तळागाळातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवणे आणि अनुसूचित जातीच्या समाजाला खऱ्या अर्थाने मुख्य प्रवाहात आणणे हेच माझे मुख्य ध्येय आहे," असा निर्धार प्राचार्य पंढरीनाथ आढाळगे यांनी व्यक्त केला.

पुरंदर तालुका पंचायत समितीच्या 'दिवे' (अनुसूचित जाती राखीव) मतदार संघातून पुरोगामी संघर्ष परिषदेच्या अधिकृत उमेदवार म्हणून प्राचार्य आढाळगे यांनी आज, बुधवार दि. २१ जानेवारी रोजी सासवड येथे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

संघर्ष नायकांचे विचार रुजवणार

अर्ज दाखल केल्यानंतर पुरोगामी संघर्ष परिषदेच्या प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, "पुरोगामी संघर्ष परिषदेचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष संघर्षनायक डॉ. प्रा. सुभाष वायदंडे यांना अपेक्षित असलेली सामाजिक क्रांती आणि चळवळ मजबूत करण्यासाठी मी निवडणुकीच्या रिंगणात उतरलो आहे. समाजातील प्रत्येक घटकाला समान न्याय मिळावा, हाच आमचा अजेंडा आहे."

प्रबळ नेतृत्वाची उपस्थिती

यावेळी प्राचार्य आढाळगे यांच्यासोबत पुरोगामी संघर्ष परिषदेचे अनेक दिग्गज पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये:

माननीय मनोजदादा भिसे (युवक प्रदेशाध्यक्ष)

गोकुळतात्या भिसे (पुणे वरिष्ठ जिल्हाध्यक्ष)

मा संदीपजी भोंडे (पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष) निखिल आढागळे. भानुदास भिसे

या नेत्यांनी प्राचार्य आढाळगे यांच्या उमेदवारीला पूर्ण पाठबळ दर्शवले असून, ही निवडणूक केवळ सत्तेसाठी नसून विचारांची लढाई असल्याचे अधोरेखित केले.

जनतेच्या समस्यांना वाचा फोडणार

अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या या मतदार संघात अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. केवळ आश्वासनं देणाऱ्या राजकीय पक्षांना बाजूला सारून, प्रत्यक्ष कृतीतून जनतेची बाजू मांडणारा प्रतिनिधी म्हणून प्राचार्य आढाळगे यांच्याकडे पाहिले जात आहे.

त्यांच्या उमेदवारीमुळे दिवे मतदार संघात आता तिरंगी किंवा चौरंगी लढत होण्याची शक्यता निर्माण झाली असून, सर्वसामान्यांचा प्रतिसाद वाढताना दिसत आहे.

## बळीराम कडू आणि परिवाराची कुमशेत गावात दहशत, पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष, गावकरी भयभीत

**प्रतिनिधी माणगाव :** कुमशेत गावात सर्व गावकऱ्यांनी मिळून गुण्यागोविंदाने रहावे, सर्व सण विनाविघ्न साजरे करावेत अशी कुमशेत गावातील गावकऱ्यांची इच्छा असते, परंतु गावातील एका कुटुंबामुळे गावातील रहिवासी तळावाखाली, भयभीत व त्रस्त आहेत.गावात शांतता प्रस्थापित करण्यासाठी पोलिस प्रशासनही अपयशी ठरलेले आहे.कुमशेत गावातील बळीराम नारायण कडू,नरेश बळीराम कडू यांची पत्नी, नम्रता नरेश कडू तिची मुलगी भूमी नरेश कडू यांनी सार्वजनिक ठिकाणी अनधिकृत पत्रा शेड व बांधकाम करुन लाकडी बांबुनी रस्ता अडवून ठेवला आहे.अशामुळे भांडण व मारामारी करण्यास बळीराम कडू परिवार स्वतःहून हाणामारीवर येत असतात.देवीची पालखी परंपरेनुसार ज्या रस्त्यावरुन जात असते तो रस्ताच अनधिकृत बांधकाम करुन अडवलेला आहे.सर्व संबंधित प्रशासनाला




अर्ज करुनही कुमशेत गावातील ग्रामस्थांना न्याय मिळालेला नाही.स्थानिक पोलीस स्टेशनलाही बळीराम कडू कुटुंबियांच्या विरोधात तक्रार दाखल केली होती, परंतु पोलीस व सरपंच यांचेही बळीराम कडू ऐकत नाही, जास्त प्रमाणात गुंडगिरी व दहशत निर्माण झालेली आहे, त्यामुळे ग्रामस्थ दहशतीखाली आहेत.बळीराम कडू याने सुरेश शाबाजी कडू,त्यांची दोन मुलं, सुरेश श्रीपती कडू व त्यांची दोन मुलं,राम गोपाळ कडू, प्रकाश गोपाळ कडू,आसाराम भाऊ दळवी, चंद्रकांत आबाराम दळवी, विवेक आबाराम दळवी, सुबोध रामचंद्र चव्हाण,दयाराम बाळाराम कडू, जनार्दन नारायण कडू, मंगेश राजाराम कडू, संतोष चंद्रकांत कडू,प्रितेश प्रविण दळवी यांच्यावर विनाकारण खोट्या केसेस दाखल केल्या आहेत.त्यांच्या या अडेलतट्टू धोरणामुळे गावातील शांतता भंग झालेली आहे.बळीराम कडू हे सेवा निवृत्त पोलिस पाटील आहेत त्याचा ते गैरफायदा घेत आहेत.असेच होत राहिले तर एक दिवस उद्रेक होईल, त्यामुळे वरिष्ठ पोलीस अधिकारी व महसूल प्रशासन यांनी या अनधिकृत प्रकरणात गांभीर्याने लक्ष देऊन रस्ता मोकळा करुन द्यावा व गावात शांतता प्रस्थापित करावी अशी कुमशेत गावातील ग्रामस्थांची मागणी आहे.यासंभर्भात गावकऱ्यांना लवकरात लवकर न्याय मिळावा म्हणून वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना कुमशेत ग्रामस्थांच्या वतीने पत्र देण्यात आले आहे.

## संत रविदास महाराज जयंती उत्सव व चर्मकार समाज मेळाव्याचे आयोजन

**नकूल उपाध्ये / कारंजा लाड:** सामाजिक एकता व प्रबोधनव्हावे या उद्देशाने राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या कारंजा तालुका शाखेच्या वतीने कारंजा येथे श्री.संत रविदास महाराज जयंती उत्सव व चर्मकार समाज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या 1 फेब्रुवारी रोजी मंगरूळपीर मार्गावरील रिलायन्स पेट्रोल पंप जवळच्या महालक्ष्मी मंगलम येथे सकाळी 11 वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कारंजा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी श्रीकांत माने असतील तर प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त तालुका

कृषी अधिकारी मधुकरराव सोनटक्के, कारंजा नगर परिषदेचे सेवानिवृत्त कर निरीक्षक रामकृष्ण रावळे,सेवानिवृत्त शिक्षक



प्रल्हादराव पानझाडे,सेवानिवृत्त सैनिक विष्णू घुडे,जीवन प्राधिकरणचे सेवानिवृत्त कर्मचारी गणेशराव भटकर,भडशिवणी ग्रामपंचायतच्या सरपंच सौ.वर्षाताई अंबाळकर , कारंजा नगरपरिषदेच्या शिक्षिका सौ.प्रमिलाताई गाठेकर (भटकर),सदाशिवराव राजगुरे धामणी (खडी), गजाननराव शेगोकार,बेंबळा,पांडुरंग चिमणकर बेलखेड (कामठा),भारतीय रेल्वेचे सेवानिवृत्त सीनियर सेक्शन इंजिनियर शंकरराव पानझाडे कामरगाव,अरुणराव वानरे शिरसोली,धनज बु. ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच प्रवीण ढाकरे,

दिगंबरराव ठाकरे निंभा जहागीर, शिक्षक बंडू ढाकरे भामदेवी, पिंपळगाव खुर्द ग्रामपंचायतचे माजी सदस्य नथ्थू शेगोकार हे उपस्थित राहणार आहेत.दरम्यान या कार्यक्रमाला कारंजा तालुक्यातील चर्मकार समाज बांधवांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या कारंजा तालुका शाखेने केले आहे.

## अव्यक्त अबोली बहुद्देशीय संस्थेच्या सर्वसाधारण सभेचे आयोजन

**प्रतिनिधी प्रांजली काळबेंडे :** अव्यक्त अबोली बहुउद्देशीय संस्था पुलगाव या साहित्य क्षेत्रातील नामांकित संस्थेची सर्वसाधारण सभा 01 फेब्रुवारी 2026 रोजी आयोजित करण्याचे निश्चित झाले आहे. साहित्य सामाजिक तसेच आरोग्य क्षेत्रात अग्रेसर कार्य करत आपला वेगळा ठसा उमटवणाऱ्या या संस्थेने विविध सामाजिक उपक्रम देखील राबवलेले आहेत.

याचाच भाग म्हणून येत्या 01 फेब्रुवारी 2026 रोजी पुढील दिशा आणि बैठकीची नियोजन करण्यासाठी सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले आहे.सदरील बैठक हॉटेल लजीज औरंगाबाद वर्धा हायवे सालोड जिल्हा वर्धा येथे होणार आहे.




तरी संस्थेच्या सर्व सभासद कार्यकारणी सदस्य यांनी या सभेस उपस्थित राहून संस्थेच्या पुढील वाटचालीस योग्य मार्गदर्शन आणि सूचना देऊन सहकार्य करावे, अशी विनंती संस्थेच्या अध्यक्षा जयश्री चव्हाण व सचिव योगेश ताटे यांनी केले आहे.

## परीक्षा केंद्र सुविधा व सीसीटीव्ही संदर्भात निधी बाबत दिलासा; शिक्षकांकडून मुंबई भाजपा अध्यक्ष आ.अमीत साटम यांचे आभार

इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर परीक्षा केंद्रांवर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे तसेच प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे अनिवार्य करण्यात आल्यामुळे अनेक शैक्षणिक संस्था व संघटनांकडून विरोध व्यक्त करण्यात आला होता. मुंबई शहर शिक्षक विकास मंडळाचे प्रा. डॉ. विशाल कडणे यांनी प्रशासनाकडे परीक्षा केंद्रावरील सुविधा व सीसीटीव्ही बसविण्यासाठी स्वतंत्र विशेष निधीची व्यवस्था शासनाने तातडीने करावी आणि निधी उपलब्ध होईपर्यंत सक्ती करण्यात येऊ नये अशी आग्रही मागणी केली होती.

या मागणीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी स्पष्ट केले की दिनांक 13 मे 2022 च्या शासन निर्णयानुसार जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना (DPDC) अंतर्गत शालेय शिक्षण विभागाशी संबंधित योजनांसाठी राखीव ठेवलेल्या 5% निधीचा वापर सीसीटीव्ही बसविण्यासाठी करता येईल अशी तरतूद आहे.या स्पष्टोक्तीनंतर अनेक संस्थाचालकांनी समाधान व्यक्त केले आहे.शैक्षणिक संस्थांना दिलासा मिळावा यासाठी विशेष प्रयत्न

> 
>
> 13 मे 2022 पासून DPDC शालेय शिक्षण विभागाशी संबंधित योजनापैकी 5% निधीपैकी आतापर्यंत किती निधी वापरला गेलासद्यस्थितीत किती निधी शिल्लक आहेसदर 5% निधी महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्यासाठी पुरेसा आहे का जर निधी अपुरा ठरत असेल, तर येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अतिरिक्त निधीची तरतूद शासनाने करावी.मुंबई शहर शिक्षक विकास मंडळाच्या वतीने आम्ही शासनाच्या स्पष्टोक्तीचे स्वागत करतो आणि सर्व संबंधित मान्यवरांचे मनःपूर्वक आभार मानतो. शिक्षक-विद्यार्थी हित जपणाऱ्या, पारदर्शक आणि सहकार्यपूर्ण निर्णयप्रक्रियेच्या माध्यमातून परीक्षा केंद्रांची गुणवत्ता व सुरक्षितता निश्चितच उंचावेल.
>
> — प्रा. डॉ. विशाल कडणे
> मुंबई शहर शिक्षक विकास मंडळ

करणारे मुंबई भाजप अध्यक्ष आ. अमितजी साटम यांचे सर्व शिक्षक संघटना आणि संस्थाचालकांच्या वतीने प्रा. डॉ. विशाल कडणे यांनी मनःपूर्वक आभार मानले आहेत. विषयावर सातत्याने मार्गदर्शन करणारे आचार्य पावन त्रिपाठी आणि किरण शेलार यांचे शिक्षक समुदायाने विशेष धन्यवाद मानले आहेत.

## राजकुमार पडघान यांचे निवासस्थानी लघु उद्योग महामंडळ अध्यक्ष जयदिप कवाडे यांची सदिच्छा भेट

**वाशीम(प्रतिनिधी) :** येथून जवळच असलेल्या अडोळी येथील सामाजिक कार्यकर्ते तथा डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान यांचे अडोळी येथील निवासस्थानी लघु उद्योग महामंडळ अध्यक्ष राज्य मंत्री दर्जा जयदिपभाई कवाडे यांनी दि.२१ जानेवारी २६ रोजी दुपारी ४:३० वाजता सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांच्या सोबत पिरीपाचे वाशीम जिल्हाध्यक्ष दौलतराव हिवराळे, समाजभूषण पुरस्कार प्राप्त प्रविण पट्टेबहादूर,रवि भगत,रिल स्टॉल आकाश, नागपूर जिल्हा



युवक अध्यक्ष,दिपक हीवराळे यांची उपस्थिती होती.सुरवातीला लघु उद्योग महामंडळ अध्यक्ष जयदिपभाई कवाडे यांचे राजकुमार पडघान व



त्यांच्या पत्नी संध्या पडघान,मुलगी कु.तन्वी पडघान व मुलगा जीत पडघान यांनी त्यांना शाल व पुष्पगुच्छ देऊनस्वागत केले. सदिच्छा भेटी वेळी जयदिपभाई कवाडे यांनी राजकुमार पडघान यांचे समाजकार्याविषयी असलेले कार्य हे कौतुकास्पद आहे . आणि आपले असलेले समाजाप्रती असलेली सहकार्य करण्याची भूमिका ही समाजाला न्याय देणारी भुमिका असून समाजावर होत असलेल्या अन्यायाला मोर्चे, आंदोलन व निवेदनाद्वारे आपण वंचीत घटकाला न्याय मिळवून देत आहात असे उद्गगार काढून प्रशंसा करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याच वेळी दौलतराव हिवराळे, प्रविण पट्टेबहादूर यांनी देखील राजकुमार पडघान यांच्या समाजाप्रती असलेली न्यायीक बाजू ही प्रेरणादायी आहे असे सांगितले.तर यावेळी लक्ष्मीबाई पडघान,बंडू पडघान,सुरज पडघान,धनराज पडघान यांचेसह गावातील महीला व पुरुष यांचेसह अनेकांची उपस्थिती होती.

दैनिक **महाराष्ट्र जीत** गुरुवार, २२ जानेवारी २०२६

वाशीम जिल्हा



# डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृह तीन महिने बंद राहणार?

## फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून नुतनीकरणाचे काम सुरू होणार

**ठाणे :** शहराच्या मध्यवर्ती भागातील राम गणेश गडकरी रंगायतनच्या नुतनीकरणाचे काम करून त्याचे काही महिन्यांपुर्वी लोकार्पण करण्यात आले असून त्यापाठोपाठ आता मानपाडा येथील डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृहाच्या नुतनीकरणाचे काम हाती घेण्यात येणार आहे. या कामाला येत्या फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून सुरूवात होणार असून या कामामुळे तीन महिने नाट्यगृह बंद राहणार असल्याची माहिती पालिका प्रशासनाकडून देण्यात आली.



ठाणे शहराच्या मध्यवर्ती भागात राम गणेश गडकरी रंगायतन आहे. तर, नव्याने वसलेल्या घोडबंदर भागातील मानपाडा परिसरात डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृह आहे. या दोन्ही वास्तू शहरातील सांस्कृतिक चळवळीचे केंद्र म्हणून ओळखल्या जातात. गडकरी रंगायतनची वास्तु जुनी झाल्याने त्याचे नुतनीकरण करण्यात आले. या कामामुळे रंगायतन काही महिने बंद होते. यामुळे घाणेकर नाट्यगृहावर नाटक, सांस्कृतिक कार्यक्रमांचा भार वाढला होता. दरम्यान, नुतनीकरणानंतर रंगायतन सुरू झाल्याने घाणेकर नाट्यगृहावरील भार कमी झाला. आता घाणेकर नाट्यगृहाच्या नुतनीकरणाचे काम हाती घेण्यात येणार असून यामुळे रंगायतनवरील भार वाढण्याची शक्यता आहे.

**नुतनीकरण कामासाठी बैठक**

घाणेकर नाट्यगृहाच्या नूतनीकरणासाठी शासनाकडून पालिकेला निधी प्राप्त झाला असून, या निधीतून विविध कामे करण्यात येणार आहेत. या कामांचा आढावा घेण्यासाठी मंगळवारी आयुक्त सौरभ राव यांनी बैठक घेतली. जलरोधक कामे, नळकाम, विद्युत कामे, प्रेक्षागृहातील प्रकाश यंत्रणा, ध्वनी व्यवस्था, हवा पडदा, वातानुकूलन व्यवस्था, रंगमंच दुरुस्ती, छतावरील उद्यान, विशेष मान्यवर कक्षातील पडदे बदलणे तसेच स्वच्छतागृहांच्या सुधारणांबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. तसेच मलनिस्सारण वाहिनीची दुरुस्ती, रंगमंचावरील लाकडी लेव्हलचे नूतनीकरण, नाटकांच्या जाहिरातींसाठी असलेले फलक डिजिटल स्वरूपात करणे, नाट्यगृहाच्या मुख्य व इतर प्रवेशद्वारांची पाहणी करून आवश्यक बदल करणे आदी बाबींवरही बैठकीत चर्चा झाली.

शासनाकडून प्राप्त झालेला निधी पूर्णतः नाट्यगृहाच्या दुरुस्ती आणि सुधारणा कामांसाठीच वापरण्यात यावा तसेच घाणेकर नाट्यगृहाच्या मुख्य प्रेक्षागृहातील तातडीच्या दुरुस्ती कामांना प्राधान्य देण्यात यावे.

नाट्यगृहाच्या नूतनीकरणाचे काम करताना कलाकार आणि रसिकांच्या सुविधांना प्राधान्य देण्यात यावे आणि यासाठी नाट्यकलावंतांशी चर्चा करून त्यांना आवश्यक असलेल्या सुविधांचा समावेश करावा, तसेच प्रेक्षकांच्या सोयीसुविधांचाही विचार करून कार्यवाही करावी, असे निर्देश आयुक्त राव यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

# करंजा जेट्टीला भगदाड, प्रवासी वाहतूक धोक्यात

**नवी मुंबई :** करंजा बंदराच्या जेट्टीला भले मोठे भगदाड पडले आहे. त्यामुळे या जलमार्गावर प्रवास करणाऱ्या शेकडो प्रवाशांना धोका निर्माण झाला आहे. या जेट्टीची दुरुस्ती करावी यासाठी करंजा बंदर विभागाने मेरिटाइम बोर्डाकडे प्रस्ताव पाठविला आहे. मात्र या मार्गावरील वाढती प्रवासी संख्या लक्षात घेता कोणताही अपघात होऊ नये यासाठी या जेट्टीचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे.



उरणहून मुंबईला ये-जा करण्यासाठी अटलसेतू आणि लोकल मार्गाचा पर्याय उपलब्ध आहे. त्यामुळे गेल्या दोन वर्षात अलिबाग(रेवस) ते उरण (करंजा) या जलमार्गावरील प्रवासी संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. ही संख्या लक्षात घेत मेरिटाईम बोर्डाने या मार्गावर अर्ध्या तासांनी बोट सेवा सुरू केली. यापूर्वी या मार्गावर एक बोट गेल्यानंतर तासभराची प्रतीक्षा करावी लागत होती. यातून उरणच्या करंजा ते अलिबाग रेवस या जलमार्गाने प्रवास सुरू आहे. त्यामुळे या मार्गावर कायम गर्दी असते. रेवस ते करंजा हा जलमार्गही बारमाही सुरू आहे. या वेळी गणेशोत्सवासाठी गावी जाणाऱ्या चाकरमान्यांनी अलिबाग ते उरण दरम्यानच्या जलप्रवासाला प्राधान्य दिले जात आहे.

**रोजच्या प्रवाशांसाठी सुखकर**

उरण किंवा अलिबाग या दोन्ही तालुक्यांना जोडणारी करंजा ते रेवस ही खाडी आहे. या खाडी मार्गातून शेकडो वर्षांपासून जलप्रवास सुरू आहे. त्यामुळे या दोन्ही तालुक्यांतील सर्वसामान्य नागरिक, व्यावसायिक, विद्यार्थी, नोकरदार हे याच मार्गाने प्रवास करीत आहेत. अलिबाग हे जिल्ह्याचे मुख्य ठिकाण आहे.

त्यामुळे दररोज अलिबागला ये-जा करणारे प्रवासी आहेत. रस्ते मार्गाने हा प्रवास कोंडीचा आणि त्रासदायक आहे. जलमार्गाने कमी वेळात ये-जा करता येत असल्याने नागरिक या मार्गाने प्रवास करीत आहेत.

# चिकन न्युडल्समध्ये चिकन नसल्यानं वाद, महिला ग्राहकावर हल्ला

**पनवेल :** नवीन पनवेलमधील सेक्टर १५ येथील साईप्लाझा इमारतीजवळ रविवारी (ता. १८) रात्री सुमारे १० वाजता ऑनलाईन मागवलेल्या चिकन न्युडल्समध्ये चिकन नसल्याचा जाब विचारल्याने एका महिला ग्राहकावर दुकानदार महिलेने मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी जखमी महिलेने खांदेश्वर पोलीस ठाणे येथे रितसर तक्रार नोंदवली आहे.

हरिग्राम केवाळे येथे राहणाऱ्या २५ वर्षीय निकिता मंडल यांनी स्विगीच्या समाजमाध्यमाद्वारे ऑनलाईन चिकन न्युडल्सची ऑर्डर दिली होती. ऑर्डर मिळाल्यानंतर न्युडल्समध्ये चिकन नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. याबाबत तक्रार करण्यासाठी त्या थेट 'एन्जॉय स्नॅक्स अ‍ॅण्ड चायनीज' या दुकानात पोहोचल्या.दुकानात त्यावेळी ३७ वर्षीय ललिता प्रसाद उपस्थित होत्या. निकिता यांनी चिकन नसल्याबाबत जाब विचारताच दोघींमध्ये शाब्दिक वाद झाला. हा वाद वाढत जाऊन शिवीगाळ झाली. तक्रारीनुसार, याच दरम्यान ललिता यांनी दुकानातील मोठ्या पळीने निकिता यांच्यावर मारहाण केली. या हल्ल्यात निकिता जखमी झाल्या. मारहाणीनंतर निकिता यांनी तात्काळ खांदेश्वर पोलीस ठाण्यात धाव घेऊन घडलेला प्रकार पोलिसांच्या निदर्शनास आणून दिला.

पोलिसांनी तक्रार नोंदवून संबंधित महिलेविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.ऑनलाईन अन्नसेवांमुळे ग्राहकांचा वेळ व सोय जरी वाढली असली, तरी तक्रार मांडताना ग्राहकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर ठरत असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे. किरकोळ कारणावरून झालेल्या या हाणामारीमुळे ऑनलाईन खाद्यपदार्थ महागात पडल्याची चर्चा होती. ग्राहकांनी तक्रार करताना संयम राखावा, तसेच विक्रेत्यांनीही ग्राहकांशी सभ्य व कायदेशीर पद्धतीने वागावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक शैलेश भद्रे हे करीत आहेत.

# खानिवडे बंधाऱ्याला गळती; तानसा खाडीतील पाणी क्षारयुक्त

## उन्हाळी पिकांना धोका, दरवर्षी लाखो खर्च करूनही कायमस्वरूपी उपाय नाही

**खानिवडे :** वसई पूर्वेतील तानसा खाडी वरील खानिवडे बंधाऱ्याला गळती सुरू झाली आहे. यामुळे या बंधाऱ्यातील पाणी साठवण क्षारयुक्त झाली आहे. असे पाणी उन्हाळी पिकांना नुकसानकारक ठरण्याची शक्यता असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

वसई तालुक्यातील तानसा खाडीवर १९८४ साली बांधण्यात आलेला कोल्हापूर टाईप बंधारा हा आता जीर्ण झाला असून त्याला मागील काही वर्षांपासून गळती सुरु झाली आहे. मुंबई अहमदाबाद महामार्गावरील ही तानसा खाडी आहे. या खाडीला दिवसातून दोनदा भरती आणि ओहोटी सुरू असते. ह्या बंधाऱ्याला गळती सुरू झाल्यामुळे भरतीचे पाणी साठवणुकीत मिसळून क्षारयुक्त होत असल्याने कोणताच



फायदा शेतकऱ्यांना शेती सिंचनासाठी घेता येत नाही.

यासाठी पाणी पुरवठा विभागाकडून मागील काही वर्षे दरसाल लाखो रुपये खर्चून दुरुस्ती केली जात आहे. मात्र त्याचा विशेष फायदा झाला नाही. चालू वर्षी तर पावसाळ्यानंतर बंदोस्ती झाल्यावर गळक्या बंधाऱ्यामुळे भरतीचे खारे पाणी मिसळून पूर्ण साठवणूक क्षारयुक्त झाली असल्याने शेतकऱ्यांनी वाडी पिके घेतली नाहीत.

मागील चार वर्षांपूर्वी पाणी पुरवठा विभागाने बंधाऱ्याच्या प्रत्येक पिलरला दोन्ही बाजूने बोअर खणून त्यामध्ये प्रेशरने सिमेंट पाणी भरण्याचे काम हाती घेतले होते. यामुळे पिलरच्या दोन्ही बाजूंनी सिमेंट फिट बसून बऱ्याच प्रमाणात गळती रोखता येते असे सांगितले होते. त्याप्रमाणे बऱ्याच प्रमाणात गळती आटोक्यात आली होती. मात्र असे असले तरी बांधाऱ्यातील खालच्या पाया च्या योग्य दुरुस्ती शिवाय गळती कायमची थांबणार नाही असे सांगितले जात आहे. त्यामुळे दरसाल दुरुस्तीवर लाखोंचा खर्च करण्यापेक्षा एकदाच काय तो योग्य उपाय करावा किंवा नवा बांधारा बांधावा अशी मागणी शेतकरी करत आहेत.

# ठाणे रेल्वे स्थानकात रुळांवर पाणी साचण्याच्या समस्येतून सुटका; स्थानकातील महत्त्वाचा प्रकल्प पूर्ण

**ठाणे :** पावसाळ्यात रेल्वे रुळांवर पाणी साचल्यास रेल्वे वाहतूक बंद करण्याची वेळ मध्य रेल्वे प्रशासनावर येते. ठाणे रेल्वे स्थानकात मुंबईच्या दिशेने रेल्वे रुळांवर दरवर्षी पाणी साचते. यातून मार्ग काढण्यासाठी रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक एकजवळ पाण्याचा निचरा होणाऱ्या भूमिगत वाहिन्यांची कामे मध्य रेल्वे प्रशासनाकडून सुरू होती. ही कामे पूर्ण झाली असून पावसाळ्यात रेल्वे रुळांवर साचणाऱ्या पाण्यातून प्रवाशांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. या कामामुळे भविष्यात मुसळधार पावसातही





रुळांवर पाणी साचणार नाही असा दावा रेल्वे कडून केला जात आहे.

ठाणे रेल्वे स्थानकातून मुंबई उपनगरात लाखो प्रवासी प्रवास करतात. तसेच नवी मुंबईत कामा निमित्ताने जाणाऱ्यांचे प्रमाण देखील अधिक असते. ठाणे रेल्वे स्थानकात अनेकदा पावसाचा जोर वाढल्यास स्थानकातील मुंबई दिशेकडील भागात रेल्वे रुळांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचते. साचलेल्या पाण्याचा वेळेत निचरा होत नसल्याने रेल्वे गाड्यांचा वेग कमी करावा लागतो.पाण्याचे प्रमाण वाढल्यास मुंबई दिशेकडील वाहतूक पाण्याचा निचरा होईपर्यंत बंद करण्याची वेळ प्रशासनावर येत असते. त्यामुळे रेल्वे गाडीत प्रवास करणाऱ्या प्रवाशांना रुळांवरून चालत स्थानक गाठावे लागते. तसेच रेल्वे वाहतुक बंद झाल्यास स्थानकात देखील प्रवाशांची गर्दी वाढते. या समस्येतून मार्ग काढण्यासाठी रेल्वे प्रशासनाने 'मायक्रोटेक' यंत्रणेद्वारा भूमिगत वाहिन्या टाकण्याचे काम हाती घेतले होते.

# शासनाचा निर्णय आणि सीपीआय(एम)चा आक्रमक पवित्रा; पालघरमध्ये नेमकं काय घडलं?

**पालघर :** सीपीआय(एम)चा चारोटी ते पालघर भव्य मोर्चा काल आणि आज ५५ किलोमीटरपेक्षा जास्त अंतर चालून आज संध्याकाळी ७ वाजता त्याने पालघर जिल्हाधिकारी कार्यालयाला धडक दिली.

दोन दिवस चाललेल्या हजारो गरीब शेतकरी महिला आणि पुरुषांप्रति थोडीही संवेदनशीलता न दाखवता, पालघर प्रशासन आणि पोलिसांनी अविचारीपणे सीपीआय(एम) मोर्चाच्या आंदोलकांना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या विस्तीर्ण आवारात मुक्काम करण्यापासून रोखण्यात आले. या ठिकाणी आंदोलकांना नेहमीच मुक्काम करण्याची परवानगी दिली जात होती असा मुद्दा आंदोलकांनी उपस्थित केला. मात्र प्रशासनाने ही मागणी अमान्य केली. त्यामुळे सीपीआय(एम)ने संपूर्ण जिल्हाधिकारी कार्यालयाला शांततेच्या मार्गाने घेराव घालण्याचा निर्णय घेतला आहे. त्याच वेळी, प्रशासनाच्या या निर्णयामुळे, जिल्हाधिकारी कार्यालयासमोरचा पालघर व बोईसर दरम्यानचा महत्त्वाचा मार्गही आंदोलकांना रोखावा लागला आहे.जिल्हाधिकाऱ्यांशी आज चर्चा होणार असताना सरकारवर जास्तीत जास्त दबाव आणण्यासाठी, सीपीआय(एम)ने आपल्या अधिकाधिक जनतेला आज सकाळी जिल्ह्याच्या प्रत्येक गावातून नि पाड्यातून अधिकाधिक संख्येने एकत्र येण्याचे आवाहन केले असून आंदोलकांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे पालघर शहरातील जनजीवनावर परिणाम होणार असून पालघर बोईसर दरम्यान प्रवास करणाऱ्यांना खारेकुरण – दापोली – उमरोळी, कोकणेर – नागझरी अथवा मनोर – चिल्हार मार्गे प्रवास करणे भाग पडणार आहे. या आंदोलनामुळे पालघर येथील जीवन विकास संस्थेच्या दोन शाळा, सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, तसेच आनंदाश्रम इंग्लिश स्कूल या शाळेतील विद्यार्थ्यांना व पालकांना गैरसोळीला सामोरे जावे लागत आहे.

# डोंबिवलीत घरगुती गॅसच्या गळतीमुळे भीषण स्फोट बालकासह पाच जण जखमी

**डोंबिवली :** घरगुती गॅसची गळती होऊन झालेल्या सिलिंडरच्या स्फोटात पाच जण जखमी झाल्याची धक्कादायक घटना सोमवारी मध्यरात्री बाराच्या सुमारास डोंबिवली पूर्वेकडील नवनीत नगर गृहसंकुलात घडली. या दुर्घटनेत होरपळलेल्यांमध्ये एका बालकाचा देखील समावेश आहे. केतन देढिया (३५), मेहुल वासाड (४०), विजय घोर (४५), हरीश लोढाया (५०) आणि त्यांचा मुलगा पार्श्व लोढाया (७) अशी जखमी झालेल्यांची नावे आहेत. या दुर्घटनेत ज्या घरात स्फोट झाला त्या घराचे मालक केतन देढिया हे जवळपास ५० टक्के भाजल्याने त्यांना उपचारांसाठी सायन येथील लोकमान्य टिळक रूग्णालयात दाखल करण्यात आले. उर्वरित किरकोळ जखमींना उपचार करून घरी सोडून देण्यात आले आहे.

डोंबिवली पूर्वेकडे देसलेपाडा परिसरात असलेल्या नवनीतनगर गृहसंकुलातील डब्ल्यू व्ही च्या ५१० नंबरच्या फ्लॅटमध्ये राहणारे केतन देढिया (३५) यांच्या घरात सिलेंडरमधून गॅसची अचानक गळती सुरू झाली होती. मध्यरात्री बाराच्या सुमारास केतन हे जेव्हा घरी परतले तेव्हा त्यांनी घरामध्ये लाईट चालू केली असता सिलेंडरमधून गळती झालेल्या गॅसमुळे मोठा स्फोट झाला. या स्फोटामध्ये केतन देडिया गंभीर जखमी होऊन त्यांच्या घराचे मोठ्या



प्रमाणात नुकसान झाले.

या स्फोटामुळे त्यांच्या शेजारी राहणारे मेहुल वासाड आणि विजय घोर हे देखील किरकोळ जखमी होऊन त्यांच्याही घराचे नुकसान झाले. त्याचबरोबर केतनदेवी यांच्या घराची खिडकी आणि ग्रील तुटून इमारतीच्या तळाला कोसळली. यावेळी इमारतीच्या तळमजल्यावर राहणारे हरीश लोढाया आणि त्यांचा लहान मुलगा पार्श्व हे दोघे बाप-लेक इमारतीच्या आवारात फिरत होते. त्यांच्या अंगावर खिडकीच्या काचा पडल्या. त्यात दोघे बाप-लेक किरकोळ जखमी झाले.

सर्व जखमींना सोसायटीतील अन्य रहिवाशांनी जवळच्या खासगी रूग्णालयात दाखल केले. या स्फोटात केतन देडिया हे जवळपास ५० टक्के भाजल्याने त्यांच्यावर प्रथम खासगी रूग्णालयात दाखल झाले. मात्र प्रकृती अधिकच गंभीर झाल्याने पुढील उपचारासाठी त्यांना सायनच्या लोकमान्य टिळक रूग्णालयात हलविण्यात आले. तर उर्वरित चार जखमींवर औषधोपचार करून घरी सोडून देण्यात आले.

**शक्तिशाली स्फोट**

दरम्यान, स्फोटाच्या आवाजामुळे परिसरातील रहिवाशांनी घाबरून घराबाहेर पळ काढला. सुरूवातीला काय झाले हे समजत नव्हते. इमारतीच्या आवारात रहिवाशांची मोठी गर्दी जमली होती. स्फोट इतका शक्तिशाली होता की ज्यामुळे केतन देढिया यांच्या घरातील खडकीचे ग्रील आणि दरवाजे वाकून सामानाचे देखील मोठे नुकसान झाले. घटनेची माहिती कळताच अग्निशामक दलाच्या जवानांसह मानपाडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.